**नमुना-१**

**खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस**

उप विभागीय अधिकारी / उपजिल्हाधिकारी (भू-संपादन)
पालघर विभाग पालघर यांचे कार्यालय
पत्ता:डेरी नं.१, ढवळे हॉस्पिटलच्या पुढे, बोईसर रोड,
ता.जि.पालघर

क्रमांक: पीडी/भूसंपादन/कावि- ६४३/२०१७, दिनांक: ०१/०९/२०१७

ज्या अर्थी, महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी **सुर्या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना** या सार्वजनिक प्रयोजनाकरिता शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण.०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२ मे, २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ मधील तरतुदीस अनुसरून खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे नावे घेण्याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे सादर केला आहे;

आणि ज्या अर्थी, जिल्हाधिकारी, पालघर यांचे आदेश क्रमांक भूसंपादन/क-१/टे-१/कावि-६४२/२०१७, दि. ११/०८/२०१७ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णय दिनांक: १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ आणि तद्नुषंगिक शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलक्यूएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५ जानेवारी, २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत;

त्या अर्थी, आता

**१.** उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार, मी, श्री. विकास महादू गजरे, उपविभागीय अधिकारी / भू-संपादन अधिकारी पालघर, विभाग पालघर, याद्वारे,

एक) अनुसूची-एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे; आणि

दोन) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समिती मार्फत भू-संपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेड्युल-१ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५% रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.

तीन) संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन वाटाघाटीद्वारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे नावे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णत: व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

२. संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) उपविभागीय अधिकारी / भू-संपादन अधिकारी पालघर विभाग पालघर यांच्याकडे दाखल करावीत.

३. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना उपविभागीय अधिकारी / भू-संपादन अधिकारी पालघर विभाग पालघर यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत / महामंडळाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत भूधारकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी / उप जिल्हाधिकारी (भू-संपादन) यांच्या कार्यालयामध्ये व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**अनुसूची-एक**

**खरेदी द्यावयाच्या जमिनिचा तपशील**

**जिल्हा: पालघर** **तालुका : पालघर**

| अ. क्र. | गावाचे नाव | भू-मापन क्रमांक / गट क्रमांक | क्षेत्र (हे. आर.) | खरेदी करावयाचे क्षेत्र (चौ. मी.) |
|---|---|---|---|---|
| १. | मेंढवण | १०/४ | ०-३५-० | २८९९.९१ चौ. मी. |
| २. | | १० अ/५ | ०-२५-० | |
| ३. | | १० | ०-३४३०-० चौ.मी. | |
| ४. | | १०/१ | १-०९-९ | |
| ५. | | १०/२ | १-३१-५ | |
| ६. | | १०/३ | १-४०-० | |

**दिनांक : ०१/०९/२०१७**
**ठिकाण: पालघर**

उपविभागीय अधिकारी / भू-संपादन अधिकारी
पालघर विभाग पालघर